# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३**

## सार्वजनिक बांधकाम विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २८**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१६, गृहनिर्माण**<br>**बाब क्रमांक: ४३, रूपये:- ९७,३९,४०,०००/-**<br>**श्री. अनिल पाटील** |
| (१) | ४७४८ | १०० | अमळनेर तालुक्यातील मारवड येथील पोलिस कर्मचाऱ्यांच्या निवास स्थानाची मोठी दुरवस्था झाली असून दुरुस्तीसाठी निधि देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (२) | ४७७२ | १० | बीड जिल्ह्यातील परळी तहसील कार्यालयाचे नूतनीकरण करणे तसेच अंबाजोगाई येथील शासकीय विश्रामगृह देखभाल, दुरुस्ती इत्यादी आवश्यक कामांसाठी निधीची तरतूद करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बांधकामे**<br>**बाब क्रमांक: ४६, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. धनंजय मुंडे** |
| (३) | ४७७६ | १० | बीड जिल्हाधिकारी जुनी इमारत, मुख्य प्रशासकीय कार्यालय, एन आय सी सेंटर या महत्त्वाच्या इमारती उपलब्ध जागेत एकाच छताखाली आणण्यासाठी आराखडा जिल्हा प्रशासनाने प्रस्तावित केला असणे, बीड जिल्हाधिकारी कार्यालय नूतनीकरण व एकत्रीकरण या कामासाठी 100 कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याची मागणी व त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पुल**<br>**बाब क्रमांक: ४४, रूपये:- ४,५२,४७,००,०००/-**<br>**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (४) | ४७८२ | १० | तिवसा मतदार संघातील ग्रामीण भागातील काही रस्ते अतिवृष्टी मुळे वाहुन गेलेत तसेच काही रस्ते नादुरस्त असल्यामुळे नागरिकांना जिव धोक्यात घेवुन दळण वळण करावे लागते करीता तिवसा, अमरावती, भातकुली व मोर्शी तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांच्या बांधकामाकरीता निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. संग्राम थोपटे** |
| (५) | ४८२८ | १० | पुणे जिल्हयातील वेल्हे तालुकयातील वेल्हे-भट्रटी-पासली-भोर्डी-पिवशी मार्गे शेवते महाड रस्ता हा वेल्हे तालुकयातील अति डोंगर, दुर्गम व अतिपावसाळी भागात विखुरलेला असून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे तोरण बांधले तो तोरणा गड, याशिवाय स्वराज्याची पहिली राजधानी राजगड असलेला तसेच मढेघाट व अनेक निसर्गरम्य ठिकाण असून येथे पावसाचे प्रमाण प्रतिवर्षी २५०० ते ४५००मि.मी. असल्याने पर्यटनासाठी वेल्हे तालुक्यात राज्यातून व राज्याबाहेरुन येणा-या पर्यटकांची संख्या मोठया प्रमाणात असते, मात्र या पुणे व रायगड या दोन जिल्हयांना जोडणारा रस्ता अद्यापि अस्तित्वात नाही. रायगड जिल्हयातील महाड तालुक्याला जोडणारा व कोकणातून वेल्हे तालुक्यातून पुण्याला जाणारा सर्वात कमी अंतराचा साधारण ९०ते १०० कि.मी. अंतराचा वेल्हे-भट्रटी-पासली-भोर्डी-पिवशी मार्गे शेवते महाड रस्ता हा कमी अंतराचा आहे. हा रस्ता झाल्यास दळणवळणाची सुविधा निर्माण होवपून स्थानिकांसाठी रोजगार निर्माण होणार आहे. त्यामुळे सदरचा रस्त्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धिरज देशमुख** |
| (६) | ४८३६ | १० | लातूर/औसा (जि.लातूर) तालुक्यातील येल्लोरी ते भादा प्रजिमा रोडचे दुरुस्ती व डांबरीकरण करणे. 3.00 किमी व प्रजिमा 9 ते माटेफळ-खंडाळा-गोंदेगाव-रामेगाव रामा 145 ढाकणी रस्ता प्रजिमा –10 कि.मी. 9/00 ते 11/00 रस्त्याचे रुंदीकरणासह सुधारणा करणे (भाग – ढाकणी ते भेटा) या रस्ताची अत्यंत दुरावस्था झाली असून नागरीकांची गैरसोय होत असणे, काही प्रसंगी छोटे मोठे अपघात होत असणे,स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने सदर रस्त्यांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विनोद निकोले** |
| (७) | ४७३८ | १०० | राज्यातील विविध ठिकाणी असलेले रस्ते व फुलांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी रुपये ७००,००,००,०००/- इतक्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्याचे ठरविण्यात आले आहे या खर्चापैकी 247,53,००,००० इतका खर्च चालू वित्ती वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागवता येणे शक्य आहे म्हणून रुपये 452,47,००,००० इतक्या रकमेची पूरक मागणी प्रस्तावित केली परंतु माझ्या डहाणू विधानसभा मतदारसंघातील अनेक रस्ते मोठ्या प्रमाणात खराब झाल्याने गावो गावी जाण्यासाठी आदिवासी नागरिकांना मोठ्या समस्येचा सामना करावा लागत असून ते रस्ते तात्काळ दुरुस्त करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (८) | ४७४७ | १० | भंडारा जिल्हयातील लाखांदूर तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, भंडारा अंतर्गत इजिमा १०२ ला जोडणारा महत्वाचा रस्ता असून सन |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | २०२२ च्या झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्ता हा कि.मी. ३/४०० ते ४/२०० मध्ये अत्यंत खराब झालेला असल्याने हा रस्ता तात्काळ दुरुस्त करण्याची आवश्यकता लक्षात घेता शासनाने करावयाची आवश्यक ती कार्यवाही. |
| (९) | ४७५३ | १० | भंडारा जिल्हयातील लाखांदूर तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग , जिल्हा परिषद, भंडारा अंतर्गत राज्यमार्ग ३६१ ला जोडणारा महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या झालेलया अतिवृष्टीमुळे सदर रस्ता हा कि.मी . ५/०० ते ६/०० मध्ये अत्यंत खराब झालेला असल्याने सदरहू रस्त्याची मजबुतीकरण करणे गरजेचे असल्याने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ४७५६ | १० | भंडारा जिल्हयातील लाखांदूर तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, भंडारा अंतर्गत इजिमा १०२ ला जोडणारा महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्ता हा कि.मी. ५/००० ते ५/९०० मध्ये अत्यंत खराब झालेला असल्याने हा रस्ता तात्काळ दुरुस्त करण्याची आवश्यकता लक्षात घेता शासनाने करावयाची आवश्यक ती कार्यवाही. |
| (११) | ४७५७ | १० | भंडारा जिल्हयातील लाखांदूर तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, भंडारा अंतर्गत इजिमा १०३ ला जोडणारा महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्ता हा कि.मी. ४/५०० ते ५/००० मध्ये अत्यंत खराब झालेला असल्याने हा रस्ता तात्काळ दुरुस्त करण्याची आवश्यकता लक्षात घेता शासनाने करावयाची आवश्यक ती कार्यवाही. |
| (१२) | ४८२४ | १० | लाखनी सावरी सोमलवाडा रेंगेपार गोंडसावरी परसोडी केसलवाडा खुर्शिपार पळसपाणी रस्ता हा लाखनी तालुकयातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, भंडारा अंतर्गत इजिमा ७६ ला जोडणारा महत्वाचा रस्ता असुन सन २०२२ च्या झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्ता कि.मी. ०/०० ते ०/७०० मध्ये अत्यंत खराब झालेला आहे. त्यामुळे या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरी नुतनीकरण करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ४८२६ | १० | रेंगेपार गोंडसावरी परसोडी केसलवाडा खुर्शिवार पळसपाणी ते रा.मा.३५६ ला जोडणारा रस्ता हा लाखनी तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, भंडारा अंतर्गत राज्यमार्ग ३५६ ला जोडणारा महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्ता हा कि.मी. ८/७०० ते १०/००, १६/०० ते १७/०० मध्ये अत्यंत खराब झालेला आहे. सदर रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | ४८३१ | १० | रा.म.क्र. ६ ते गडेगांव किन्ही दैतमांगली चिखलाबोडी रस्ता हा लाखनी तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद , भंडारा अंतर्गत रा.म.क्र. ६ ला जोडणारा महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्ता कि.मी. २/० ते ४/० मध्ये अत्यंत खराब झालेला असल्याने सदर रस्त्याचे डांबरीकरण व नुतनीकरण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१५) | ४८३२ | १० | एकोडी किन्ही पळसपाणी निप्परटोला आतेगांव उमरझरी रस्ता हा साकोली तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, भंडारा अंतर्गत इजिमा ५९ ला जोडणारा महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्ता हा कि.मी.३/०० ते ४/०० मध्ये अत्यंत खराब झालेला असुन त्यांचे मजबुतीकरण करण्याची आवश्यकता व उपाययोजना. |
| (१६) | ४८३३ | १० | साकोली बोदरा राज्यमार्ग ३५६ ला जोडणारा मार्ग खैरी आमगांव खु. धानोड आमगांव कला बाम्पेवाडा इजिमा हा रस्ता साकोली तालुक्यातील सार्वजनिक बाधकाम विभाग, जिल्हा परिषद , भंडारा अंतर्गत राज्यमार्ग ३५६ ला जोडणारा महत्वाचा रस्ता असून सन २०२२ च्या झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर रस्ता हा कि.मी. ११/०० ते १२/०० मध्ये अत्यंत खराब झालेला असुन मजबुतीकरण करण्याची आवश्यकता व उपाययोजना. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (१७) | ४७८४ | १० | "राज्यातील विविध ठिकाणी असलेल्या रस्ते व पूलांच्या देखभाल दुरुस्तीसाठी शासनाकडून निधीची तरतूद करण्यात आलेली असते, तथापि,मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्गालगत सुविधा केंद्र उभारण्यास विलंब होत असणे, परिणामी राज्यातील वाहन चालकांची प्रचंड गैरसोय होत असणे, सदर महामार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या द्वारे बांधला असणे, नागपूर ते शिर्डी पर्यंतचा महामार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला असणे,तथापि या महामार्गावर अद्याप आवश्यक सुविधा उपलब्ध नसणे, महामंडळाने महामार्ग खुला झाल्याच्या एक महिन्यानंतर विलंबाने सुविधा केंद्र स्थापन करण्याची निविदा काढलेली असणे, मंडळाची दिरंगाई वाहन चालकांसाठी घातक ठरत असणे, समृद्धी महामार्गावर नागपूर कडून मुंबईकडे जाताना वायफळ गणेशपुर, शिवनी, मांडवा, कडवंची, मरळ व आमणे येथे तर मुंबईकडून नागपूरला येताना आमणे, मरळ, मांडवा, शिवनी, रेणकापूर व वायफळ येथे सुविधा केंद्रे प्रस्तावित असणे, नियमानुसार जबाबदार कंपनीने 18 महिन्यानंतर पायाभूत सुविधा आणि पाच वर्षानंतर संपूर्ण सुविधा विकसित करणे अशी अट टाकलेली असल्यामुळे या महामार्गावर आणखी दोन वर्षे आवश्यक सुविधा मिळणार नसल्याचे स्पष्ट होणे, यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता तथा उपाययोजना" |
| (१८) | ४८१० | १० | "राज्यातील विविध ठिकाणी असलेल्या रस्ते व पूलांच्या देखभाल दुरुस्तीसाठी शासनाकडून निधीची तरतूद करण्यात आलेली असणे, तथापि मुंबई गोवा महामार्ग रुंदीकरण प्रकल्पातील पनवेल ते इंदापूर या टप्प्याची जबाबदारी असलेल्या भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला मुंबई उच्च न्यायालयाने माहे जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात ताशेरे ओढलेले असणे, या टप्प्याचे काम अतिशय संथ गतीने सुरू असल्यामुळे तसेच या टप्प्यातील शून्य ते 42 किलोमीटर या टप्प्याचे काम पूर्ण झाल्याचा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचा दावा चुकीचा असल्याची बाब स्वतः उच्च न्यायालयाने निदर्शनास आणलेली असणे, यापूर्वी देखील वेळोवेळी न्यायालयाने ताशेरे ओढल्यामुळे आणि संपूर्ण कोकणवासीयांना आवश्यक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | असलेल्या महामार्गाचे काम मोहीम घेऊन पावसाळयापूर्वी पूर्ण करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (१९) | ४८११ | १० | "राज्यातील विविध ठिकाणी असलेल्या रस्ते व पूलांच्या देखभाल दुरुस्तीसाठी शासनाकडून निधीची तरतूद करण्यात आलेली असणे, तथापि एकीकडे मुंबई-गोवा महामार्गाच्या तसेच अलिबाग-रोहा या राज्य मार्गाचे काम देखील रखडल्याचे निदर्शनास येणे, सदरहू महामार्गाच्या एकूण 177 कोटी रुपयांच्या खर्चापैकी सदर कामाचा ठेकेदार 18 कोटी रुपयांची आगाऊ रक्कम घेऊन गुजरात मध्ये फरार झाला असल्याचेही उघडकीला आलेले असणे, सार्वजनिक बांधकाम विभागाने जेआरए रस्ता प्रकल्प या कंत्राटदार कंपनीला वारंवार नोटिसा बजावल्या असणे, ठेका मंजूर होऊन सुमारे एक वर्षाचा कालावधी उलटूनही या मार्गाचे काम रखडले असणे, यासंदर्भात चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून दिलेला अग्रिम वसूल करण्याच्या बाबतीत करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (२०) | ४८१३ | १० | "राज्यातील विविध ठिकाणी असलेल्या रस्ते व पूलांच्या देखभाल दुरुस्तीसाठी शासनाकडून निधीची तरतूद करण्यात आलेली असते, तथापि मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाला पर्याय म्हणून तयार करण्यात आलेला खोपोली - पाली मार्ग उद्घाटन होण्यापूर्वी उखडलेला असणे, या महामार्गाचे ९६% काम २०० कोटींमध्ये पूर्ण झाले असताना या मार्गावर विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर मोठे मोठे खड्डे पडल्यामुळे कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालेले असणे, उद्घाटन होण्यापूर्वीच मार्गाची अवस्था दयनीय झाल्यामुळे सदर कामाची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, तसेच महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाचे उप अभियंता सचिन निफाडे यांच्यावर वन जमिनीतून ८० मीटर बाय २० मीटर अंतराचा मार्ग वनखात्याची कुठलीही परवानगी न घेता रस्ता तयार केल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा देखील झालेला असणे, खोपोली-पाली या मार्गाची रुंदी ३० मीटर असून यामध्ये कॉंक्रिटीकरण, साईड पट्टी, गटार, रस्त्याच्या दुतर्फा झाडे, फलक रिफ्लेक्टर अशा प्रकारच्या बाबींचा समावेश असणे, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाकडून रुंदीकरणाचे काम २०१६ पासून हाती घेण्यात आलेले असणे,यासाठी शासनाकडून २०० कोटी रुपये तरतूद देखील करण्यात आलेली असणे, तथापि मिरकुटवाडी येथील पूलाचे व रस्त्याच्या काही भागाचे काम अद्याप बाकी असणे, या सर्व बाबींची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता व काम दर्जेदार होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (२१) | ४८१६ | १० | "राज्यातील विविध ठिकाणी असलेल्या रस्ते व पूलांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाकडून वेळोवेळी निधीची तरतूद करण्यात येते, तथापि,मुंबई नागपूर समृद्धी महामार्गाचे लोकार्पण झाल्यापासून महामार्गावर घडत असलेल्या अपघातांच्या घटना वाढत असणे, 40 म्हशी घेऊन जाणारा ट्रक जालना जिल्ह्यातील बदनापूर शिवारात उलटून झालेल्या अपघातात नऊ म्हशी मृत्युमुखी पडल्या असणे, जलद गतीने प्रवास व्हावा म्हणून शासनाने कोट्यावधी रुपये खर्च करून मुंबई नागपूर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | समृद्धी महामार्ग बनविला असताना या मार्गावर मोठ्या प्रमाणावर होणारे अपघात टाळण्यासाठी राज्य शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना” |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (२२) | ४७७३ | १० | बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील नाथरा-इंजेगाव रस्त्यावरील मोठ्या पुलाचे काम करण्यासाठी 5 कोटी रुपये निधीच्या तरतुदीची मागणी केलेली असणे, या पुलाचे काम वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असल्याने सदर निधी मंजूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पुल**<br>**बाब क्रमांक: ४५, रूपये:- १,९०,००,००,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (२३) | ४७७८ | १० | नांदुरा ते जळगाव जामोद या रस्त्यावरुन जाणाऱ्या व येणाऱ्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. रेल्वे क्रॉसींगवरील गेट बंद झाल्यानंतर वाहनांच्या लांबच लांब मोठ्या रांगा लागुन तासन् तास लोकांना ताटकळत उभे राहावे लागते. यामुळे शहरातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र.53 (जुना क्र.6) वर वाहतुकीस अडथळा निर्माण होवून रुग्णवाहीका, अंतयात्रा, शाळेमधील विद्यार्थी, शासकीय कर्मचारी तसेच सामान्य लोकांची खुप गैरसोय होत असून याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. कुणाल पाटील** |
| (२४) | ४७७४ | १० | धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील लोणखेडी - नेर - महालपंढरी - नुरनगर ते चिंचवार रस्ता इजिमा - १८ वरील पांझरा नदीवर पूल बंधारा बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार केलेली असणे, सदर रस्त्यांवरील नदीवर पुलाचे बांधकाम झाल्यास परिसरातील शेतकरी व नागरिकांना येण्या जाण्यास सोयीचे होणार आहे. तरी सदर मागणी लक्ष्यात घेता शासनाने या रस्त्यांवरील नदीवर पुलाचे बांधकाम करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. |
| (२५) | ४७७७ | १० | धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील नेर येथील महाल पांढरी नूरनगर येथे पांझरा नदीवर पूल नसल्याने नूरनगर ते आदिवासी वस्तीत व स्मशानभूमीकडे जाण्या व येण्यासाठी ग्रामस्थांना पाण्यातून जावे लागते. त्यामुळे नेर येथील पांझरा नदीवर पूल बंधारा बांधण्यात यावा, तसेच धामणगाव ते खोरदड रस्त्यावरील बोरी नदीवर मोठ्या पुलाचे पोचमार्गासह बांधकाम करणे, तसेच मांडळ ते होरपाडा रस्त्यावर बोरी नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करणे, जुने भदाणे ते नवे भदाणे या दोन्ही गावांना जोडणारा पुलाची मागणी होणे, चौगाव येथील आदिवासी वस्तीजवळ विरास नदीवर पुलाची मागणी असणे, रावेर ते जुन्नेर रस्त्यावर लहान पुलाचे बांधकाम करणे, शिरधाने गावाजवळ कन्हेरी नदीवर पुलाचे पोच मार्गासह बांधकाम करण्याची मागणी, विश्वनाथ गावाजवळ लहान पुलाची मागणी असणे, चांदे, खोरदड ते कुंझर येथे लहान पुलाची मागणी असणे, धुळे तालुक्यातील अशा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अनेक गावांच्या महत्वाचा ठिकाणी पुलांची मागणी असून सदर ठिकाणी पुलांची बांधकामे करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी धुळे तालुक्यातील या पुलांच्या कामांना शासनाने तातडीने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना, व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वतनिक बांधकामे**<br>**बाब क्रमांक: ४६, रूपये:- १,०००/-**<br>**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (२६) | ४८०१ | १० | भातकुली पंचायत समितीची इमारत जुनी असून पंचायत समिती करीता भातकुली पंचायत समितीचे नविन प्रशासकीय इमारत (अमरावती मुख्यालय) बांधकाम करणे आवश्यक आहे करीता नविन प्रशासकीय इमारत बांधकाम करीता निधी उपलब्ध देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२७) | ४८०८ | १० | अमरावती पंचायत समितीची इमारत जुनी असून अमरावती पंचायत समितीचे नविन प्रशासकीय इमारत बांधकाम करणे आवश्यक आहे करीता नविन प्रशासकीय इमारत बांधकाम करीता निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२८) | ४८१५ | १० | अमरावती जिल्हा परिषद इमारत फारजुनी असून जि.प. अंतर्गत काही कार्यालय बाहेर असल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे एकाच प्रशासकीय इमारतीत सर्व प्रशासकीय कामे होण्याचे दृष्टीने नविन प्रशासकीय इमारत बांधकाम रकरीता रु. 61.07 कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.